पो. स्टे. बिलोली
गु.र. 159/19
दि. 01/09/2019

बिलोली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** बिलोली **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0210 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/09/2019 06:54 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ सु. 2018 | 7, 7(A) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** शनिवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 31/08/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 31/08/2019
**Time From (वेळेपासून):** 17:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:05 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/09/2019 **Time (वेळ):** 04:45 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/09/2019 04:45 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 01 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** बिलोली ,बिलोली

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** परमेश्वर वैजनाथ पवार

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned by CamScanner

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पद्मजा सिटी कौठा नांदेड ,नांदेड ,नादेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पद्मजा सिटी कौठा नांदेड ,नांदेड ,नादेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोलसिंह अंकुशराव भोसले | | | 1. बिलोली ,बिलोली ,बिल्लोळी ,नांदेड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्यामकुमार साईबाबु बोनगे | | | 1. 2/94/03B,मुबारकनगर ,निजामाबाद, निजामाबाद ,NIZAMABAD,तेलंगाना, भारत |
| 3 | श्रीनिवास सत्यनारायणा जिंनकला | | | 1. 18/793,अशोकनगर बक्कलवाडा शाळे मागे ,मिरयालगुडा नलगौंडा ,नलगौंडा , NALGONDA,तेलंगाना,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | दोन हजार रुपयाचे 100नोटा | 200,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 200,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 01/09/2019 फिर्यादमी परमेश्वर वैजनाथ पवार, वय 48 वर्ष, व्यवसाय व्यापार रा. पद्मजासीटी कौठा, नांदेड. मो. क्र. 9421785555समक्ष पोलीस स्टेशन बिलोली येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन दिनांक 30/08/2019 रोजी पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयात हजर जावुन लाचमागणीची लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने पोलीस उपअधिक्षक श्री प्रशांत संपते यांनी दोन शासकीय पंच बोलवुन त्यांची, सापळा पथकातील इतर सर्व सदस्यांची मला व माझी त्यांना ओळख करून दिली. त्यानंतर पोउपअ श्री संपते यांचे समक्ष दोन्ही पंचाना मी माझी तोंडी तक्रार सांगीतली की, माझे भावाचे नावावरील एम.एच. 26 बी.ई. 6009 व एम.एच. 26 बी.ई. 5009 असे दोन वाळु वाहतुकीचे हायवा टिप्पर तहसिलदार बिलोली यांनी अनाधिकृतपणे वाळु वाहतुक करीत आहे म्हणुन तहसिल कार्यालय येथे लावले असुन सदर वाळुचे हायवा टिप्पर सोडण्यासाठी श्री भोसले उपविभागीय अधिकारी, उपविभाग, बिलोली हे स्वतः व त्यांचे खाजगी लोक श्यामकुमार बोनगे, श्रीनिवास जिंनकला यांचे मार्फतीने 2,00,000/- रू.ची मागणी करीत असल्याबाबत वगैरे मजकुराची लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीवर पोउपअ श्री संपते यांचे समक्ष तोंडी व लेखी तक्रार सारखीच असल्याची खात्री करून दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली आहे. त्यानंतर मला व दोन्ही पंचाना सापळा कार्यवाहीचा उद्देश सांगुन माझे स्वतःचे, पोउपअ श्री संपते यांचे व दोन्ही पंचांचे परिचय दर्शक वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर सर्व सापळा पथक नायगाव मार्गे बिलोली जवळील बायपास दगडापुर परिसरातील महादेव मंदीराजवळ सुरक्षित ठिकाणी थांबुन माझे जवळ डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन माझे सोबत, माझा भाउ व पंच क्र. 1 श्री गेडेकर यांना पाठवुन खाजगी इसम श्यामकुमार यांची भेट घेणेसाठी पाठवुन लाचमागणी पडताळणी केली असता श्यामकुमार बोनगे यांनी सांगीतले की, सिनुने (श्रीनिवास) दोन लाख बोला है असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यानंतर मी श्री भोसले उपविभागीय अधिकारी यांना भेटुन श्यामकुमार व



Scanned by CamScanner

श्रीनिवास मागत असलेली रक्कम ही श्री भोसले यांचीच असल्याची खात्री करण्यासाठी श्री भोसले यांना भेटुन माझे कामासंबधाने बोललो असता श्री भोसले उपविभागीय अधिकारी बिलोली यांनी मला बघा तिकडे काय असेल ते, तसेच मी श्यामकडे जावु का असे विचारले असता लोकसेवक भोसले यांनी बरं असे म्हणुन श्यामकुमार बोनगे यांचेकडे लाचेची रक्कम देण्यास सहमती दर्शविल्याचे निषपन्न झाले आहे. त्यानंतर आज दिनांक 31/08/2019 रोजी लोकसेवक भोसले यांचे सांगणे प्रमाणे श्यामकुमार बोनगे हे माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारणार असल्याने सापळा आयोजित करण्यापूर्वी लाचलुचपत प्रतिबंध विभाग कार्यालय नांदेड येथे सापळापूर्व कार्यवाही केली ज्यात मला व दोन्ही पंचाना अल्ट्राव्हायलेट लम्प व अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगीतले. माझी अंगझडती घेतली व अल्ट्राव्हायलेट लम्प व अँथ्रासीन पावडर यांच्या वापराचे प्रात्यक्षिक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेचे वर्णन व क्रमांक एका कागदावर लिहुन घेवुन लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावले व सदर रक्कम माझे अंगावरील नेसनीस असलेल्या पन्टचे समोरील बाजुचे उजव्या खिशात ठेवले व लाच स्विकारल्यानंतर करावयाचा इशारा मला सांगुन तशी सविस्तर सापळा पुर्व कार्यवाही करून पोउपअ श्री संपते, मी, पंच क्र. 1 व सापळा पथकातील सर्व सदस्य मी आनलेल्या चारचाकी वाहनाने बस स्टन्ड परिसरात सुरक्षित ठिकाणी थांबलो सदर ठिकाणी पोउपअ श्री संपते यांचे सुचनेप्रमाणे पोकाँ चौधरी यांनी माझेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन मी आनलेल्या चारचाकी वाहनात थांबण्यास सांगुन उर्वरित सापळा पथक बस स्टन्ड परिसरात थांबुन सापळा लावण्यात आला. त्यानंतर खाजगी इसम श्यामकुमार बोनगे हे बस स्टन्ड बिलोली येथे आले तेव्हा मी त्यांना हात दाखवुन माझे गाडीत बसण्यास सांगीतले असता ते सदर गाडीत येवुन बसले तेव्हा त्यांच्या सोबत मी माझे कामासंबधाने बोललो असता त्यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याने मी सदर रक्कम त्यांचे समोर धरली असता त्यांनी पंचासमक्ष लाचेची रक्कम स्विकारून हातात धरली. तेव्हा मी सापळापुर्व कार्यवाही मध्ये ठरल्याप्रमाणे लाच स्विकारल्याचा इशारा केला. तेव्हा माझेवर लक्ष ठेवुन असलेले पोउपअ संपते, पोनि काकडे, पंच क्र. 2 व सापळा पथकातील सर्व सदस्य आले तेव्हा पोउपअ संपते यांचे सुचनेप्रमाणे पोकाँ चौधरी यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यानंतर पोउपअ संपते यांनी पंच क्र. 1 गेडेकर यांना विचारले की, तक्रारदार यांना कोणी लाच मागीतली व कोणी स्विकारली तेव्हा पंच क्र. 1 यांनी त्यांचे पाठीमागील सिटवर बसलेल्या व्यक्तीकडे इशारा करून हे श्यामकुमार बोनगे असुन यांनीच लोकसेवक भोसले यांचे सांगणेप्रमाणे तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम 2,00,000/- रू. स्विकारून हातात धरली आहे. तेव्हा पोउपअ संपते यांनी खाजगी इसम यांना स्वतःची व सापळा पथकाची ओळख करून देवुन खाजगी इसम यांना त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्यामकुमार साईबाबु बोनगे, वय 34 वर्ष, व्यवसाय खाजगी नौकर, रा. मुबारकनगर, घर क्र. 2.94/3 बी निजामाबाद ता.जि. निजामाबाद असे सांगीतले. त्यानंतर पोउपअ संपते यांनी पंच क्रमांक 2 यांचे करवी खाजगी इसमाने हातात धरलेली लाचेची रक्कम घेण्यास सांगुन ती पंच क्र. 1 यांचे जवळ सापळा पुर्व कार्यवाही लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे क्रमांक व वर्णनांषी जुळवुन पाहिले असता सदरच्या नोटा त्याच असल्याची खात्री झाली आहे. त्यानंतर पोउपअ संपते यांचे सुचनेप्रमाणे पोना गायकवाड यांनी तक्रारदार यांचे वाहनात कृत्रीम अंधार केला व अँल्ट्राव्हायलेट लम्प चे प्रकाशात नोटांचे परिक्षण केले असता सदर नोटावर अँथ्रासिन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर नोटा आणि नोटांचे क्रमांक लिहीलेला कागद पुढील आदेशापर्यत पंच क्र. 2 यांचेकडे ठेवण्यास दिले होते. त्यानंतर पंचासंमक्ष घटनास्थळावर आवश्यक ती कार्यवाही करून उर्वरित सापळा कार्यवाही पंचनाम्याचे कामकाज लाचलुचतप प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे करण्याचे ठरविले.त्यानंतर लाप्रवि नांदेड येथे सापळा कार्यवाही मध्ये वापरण्यात आलेली अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम 2,00,000/-रु. ज्यात 2,000/-रु. दराचे 100 चलनी नोटा व लाचमागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझे व लोकसेवक भोसले आणि खाजगी इसम श्यामकुमार बोनगे आणि श्रीनिवास जिनकला यांचेत झालेले संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील वापरलेले मेमरी कार्ड पंचासमक्ष जप्त केले आहे तसा दिनांक 30/08/2019 व दिनांक 31/08/2019 रोजीचा पोउपअ संपते यांनी सविस्तर लाचमागणी पडताळणी, सापळा पुर्व व सापळा कार्यवाही पंचनामा केला आहे.एकंदरित माझे दिनांक 30/08/2019 रोजीचे तक्रारीच्या अनुषंगाने शासकीय पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाहीत आरोपी लोकसेवक भोसले व खाजगी इसम श्यामकुमार बोनगे आणि श्रीनिवास जिनकला यांनी माझे भावाचे नावावरील दोन रेतीचे टिप्पर तहसिल कार्यालय बिलोली येथुन सोडण्यासाठी 2,00,000/- रू. लाच स्विकारण्याचे मान्य करून ती 17.05 वाजताचे सुमारास बस स्टन्ड बिलोली येथे माझे चारचाकी वाहनात स्विकारली आहे. लोकसेवक भोसले यांनी शासकीय पदाचा गैरवापर करून स्वतःचा आर्थीक फायदा करून घेण्याचा प्रयत्न करून खाजगी इसमामार्फत लाच मिळविण्याचा प्रयत्न करून लाच घेण्यास प्रोत्साहन दिले असुन खाजगी इसम श्रीनिवास जिनकला यांने मध्यस्ती करून लाच मिळुन देण्याचा प्रयत्न करून सहकार्य केले असुन श्यामकुमार बोनगे यांनी लाचेची मागणी करून ती स्विकारली आहे. म्हणुन माझी 1. अमोलसिंह अंकुशराव भोसले, वय 37 वर्ष, उपविभागीय अधिकारी, बिलोली जि. नांदेड मुळ रा. शिवपार्वती कालठण रोड इंदापुर ता. इंदापुर जि. पुणे 2. श्यामकुमार साईबाबु बोनगे, वय 34 वर्ष, व्यवसाय खाजगी नौकर, रा. मुबारकनगर, घर क्र. 2.94/3 बी निजामाबाद ता.जि. निजामाबाद (तेलगंना स्टेट)3. श्रीनिवास सत्यनारायणा जिनकला वय 43 वर्ष, व्यवसाय व्यापार, रा. 18.793 अशोकनगर, बक्कलवाडा शाळे मागे, मिरयालगुडा, नलगोंडा मिरयालगुडा (आंध्रप्रदेश) यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 (संषोधन-2018) अन्वये योग्य ती कायदेषिर कार्यवाही होणेस विनंती आहे. समक्ष ही फिर्याद दिली सही ( परमेश्वर वैजनाथ पवार) रा. पद्मजासिटी, कौठा नांदेड

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): BHAGWAN MARIBA DHABADGE(I (Inspector)) / POBN51351 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned by CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): BHAGWAN MARIBA DHABADG
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN51351

पोलीस ठाणे



Scanned by CamScanner